उंदराचे लग्न

एक प्राचीन लोककथा

मराठी : अश्विनी बर्वे

एकदा एका उंदराला बायको पाहिजे होती.

पण त्याला सामान्य बायको नको होती.

“जर मी जगातल्या सर्वात शक्तिशाली प्राण्याच्या मुलीशी लग्न करू शकत नाही. त्याने आपले आपल्याला म्हटले.

“तर मी कोणाशीच लग्न करणार नाही.”

बास, जगातला सर्वात शक्तिशाली प्राणी शोधण्यासाठी उंदीर निघाला.

तो सूर्याकडे गेला. “शेवटी,” उंदराने विचार केला, “सूर्या इतके शक्तिशाली कोण असेल?”



जेव्हा उंदीर सूर्याकडे गेला तेव्हा तो म्हणाला,

“तुम्ही जगात सगळ्यात अधिक शक्तिशाली आहात. म्हणून मी तुमच्या मुली बरोबर लग्न करू इच्छितो. जर मी तुमच्या मुली बरोबर लग्न केले नाही तर मी कोणाशीच लग्न करणार नाही.”

“मी जगातला सर्वात शक्तिशाली नाही, माझ्या पेक्षा ही असा शक्तिशाली एक जण आहे - ढग.”





“ढग!” उंदीर म्हणाला.

“हो,” सूर्य म्हणाला.

“जर माझ्या समोर ढग आले तर मी पृथ्वी प्रकाशित करू शकत नाही.”

“मग मी ढगाकडे जातो,” उंदीर म्हणाला.

“तुझी मुलगी तुझ्याजवळच ठेव!”

आणि उंदीर ढगाच्या शोधात निघाला.

जेव्हा उंदीर ढगाकडे पोहचला तेव्हा म्हणाला, “तुम्ही जगात सगळ्यात शक्तिशाली आहात, म्हणून मी तुमच्या मुलीबरोबर लग्न करू इच्छितो. जर मी तुमच्या मुलीशी लग्न करू शकलो नाही तर, मी लग्नच करणार नाही.

ढग म्हणाले, “माझ्याहून अधिक शक्तिशाली कोणीतरी आहे आणि तो म्हणजे – वारा.



“वारा!” उंदीर म्हणाला.

“हो,” ढग म्हणाला.

“वाऱ्याची एक झुळूक मला दूर उडवून लावते.”

“मग मी वाऱ्या जवळ जातो,” उंदीर म्हणाला.

“तुझी मुलगी तुझ्याजवळ ठेव!”





आणि उंदीर वाऱ्याच्या शोधात निघाला.



जेव्हा उंदीर वाऱ्या जवळ पोहचला, “तुम्ही जगात सगळ्यात शक्तिशाली आहात. म्हणून मला तुमच्या मुलीबरोबर लग्न करायचे आहे. जर मी तुमच्या मुलीबरोबर विवाह करू शकलो नाही तर मी कोणाच बरोबर लग्न करणार नाही.”

“मी जगात सगळ्यात अधिक शक्तिशाली नाही,” वारा म्हणाला. “माझ्याहून कोणतरी अधिक शक्तिशाली आहे - ते म्हणजे मीनार – जी तू त्या तिथे बघतो ना ती.”

“मीनार!” उंदीर म्हणाला.

“हो,” वारा म्हणाला. “मी इतका शक्तिशाली नाही की, ही मीनार पाडू शकेल.”

“मग मी मीनार कडे जातो,” उंदीर म्हणाला.

“तुझी मुलगी तुझ्या जवळ ठेव.”

आणि उंदीर मीनारच्या शोधात निघाला.

जेव्हा उंदीर मीनार कडे पोहचला तेव्हा तो म्हणाला. “जगातल्या सर्वात शक्तिशाली प्राण्याला मी सगळ्या जगात शोधले.”

मी सूर्याकडे गेलो होतो.

मी ढगाकडे गेलो होतो.

मी वाऱ्याकडे गेलो होतो.

आणि आता मी तुझ्याकडे आलो आहे.

तुम्ही जगात सगळ्यात शक्तिशाली आहात काय?

जर तुम्ही असाल, तर मी तुमच्या मुलीशी लग्न करू इच्छितो.

“मी जगात सगळ्यात शक्तिशाली नाही,” मीनार म्हणाले. “माझ्याहून अधिक शक्तिशाली कोणी दुसरे आहे – आणि तो आहे एक छोटा उंदीर.”

“एक छोटा उंदीर!” उंदीर म्हणाला.

“हो,” मीनार म्हणाले.

“तिथे माझ्या पायाजवळ एक छोटा उंदीर तुला दिसतो आहे का?

तो एक भोक पाडतो आहे. एक दिवस ते भोक एवढे मोठे होईल की, मी पडून जाईन. छोटा उंदीर सगळ्यात जास्त शक्तिशाली आहे. जगात सगळ्यात जास्त शक्तिशाली प्राणी तो आहे.

.



“जगात सगळ्यात शक्तिशाली प्राणी!”

उंदीर म्हणाला. “मग मी छोट्या उंदराकडे जाईन आणि त्याच्या मुलीशी लग्न करेन. आणि आमचा विवाह हा जगातील सगळ्यात छान विवाह असेन.”

आणि त्यांने
तसेच केले.

शेकडो–शेकडो वर्षांपूर्वीही ही लोककथा

वाचायला मजा येत होती.

आणि आज ही ती वाचायला मजा येत आहे.